# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### आर्थिकदृष्टया मागासवर्गीय (ईसीबी) विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु करण्याबाबत

**(१) ४८१४ (२३-११-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई व पुणे तसेच अनेक महत्वाच्या ठिकाणी हजारो विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा आणि इतर शिक्षणासाठी येत असून त्यामध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा आर्थिकदृष्टया मागासवर्गीय घटकांतील विद्यार्थ्यांच्या महानगरातील वास्तव्यासाठी दिनांक ३ जुलै, १९७३ च्या शासन निर्णयानुसार राज्यात ११ वसतिगृहे सुरु करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ४७ वर्षे इतका प्रदीर्घ कालावधी होवूनही सदर ११ वसतिगृहांच्या संख्येत अधिकची वाढ केली नसून त्यातील ठाणे, अहमदनगर, नागपूर, पुणे व पनवेल या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी अद्याप वसतिगृहे

उपलब्ध नसल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई व पुणे विभागात आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील मुला-मुलींसाठी १ हजार विद्यार्थी क्षमतेची दोन स्वतंत्र वसतिगृहे सुरु करण्याची मागणी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, उच्च शिक्षण संचालक व प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचेकडे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये लेखी निवेदनानुसार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने व अन्य महत्वाच्या ठिकाणी अधिकची वसतिगृहे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१५-१२-२०२१) :** (१) अशी वस्तुस्थिती आहे.

(२) आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता शासन निर्णय दिनांक ०३/०७/१९७३ अन्वये १० ठिकाणी व शासन निर्णय दिनांक ०२/०९/१९८२ अन्वये १ ठिकाणी अशा एकूण ११ ठिकाणी वसतिगृह सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.

(३) ठाणे, अहमदनगर, नागपूर, पुणे व पनवेल या ठिकाणी जागा उपलब्ध होऊ शकली नसल्याने, त्याऐवजी नंदुरबार, यवतमाळ, वर्धा, सांगली व नांदेड या जिल्ह्यात वसतिगृह सुरु करण्यात आली आहेत.

(४) व (५) असे निवेदन प्राप्त झाले आहे. तथापि, सद्य:स्थितीत आर्थिकदृष्टया मागास घटकातील मुला-मुलींसाठी वसतिगृह सुरु करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दिनांक १३/०७/२०१८ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे. या शासन निर्णयानुसार डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असलेल्या शासन / स्थानिक संस्था / मंडळ यांच्या मालकीच्या व विनावापर पडून असलेल्या इमारती नोंदणीकृत संस्थांना भाड्याने देण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात कंत्राटी शिक्षक विद्यापीठ निधीचा वापर करीत असल्याबाबत

**(२) ५२८७ (१८-११-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सन २००५ ते २०१० या कालावधीत तत्कालीन कुलगुरुंनी अनेक नवीन विभागांची निर्मिती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्मिती केलेल्या विभागामध्ये अनेक विभागांना विद्यार्थीच मिळालेले नसताना ओळखीच्या लोकांची कंत्राटी पध्दतीने शिक्षकपदी निवड करण्याच्या हेतुने विभाग सुरु केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यापीठ निधीतुन कंत्राटी शिक्षकांवर २५ कोटीहुन अधिक खर्च होत असल्याने याप्रकरणी चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांची गरज पूर्ण व्हावी म्हणून सदर विद्यापीठाच्या विद्या परिषद व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ च्या कलम ८(२) येथील तरतुदीनुसार नवीन विभागांची निर्मिती करण्यात आली. तद्नंतर सदर नियुक्त्या विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम ७६ अन्वये वेळोवेळी जाहिरात देऊन करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील अभियांत्रिकी महाविद्‌यालयातील शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित असल्याबाबत

**(३) ९०१८ (१५-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.विलास पोतनीस, श्री.अरुण लाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्‌यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्‌यार्थ्यांना शासनामार्फत शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती दरवर्षी देण्यात येत असून करोना विषाणू महामारीच्या काळामुळे शिष्यवृत्तीचे अर्ज माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये महाडीबीटी पोर्टलमध्ये सात ते आठ महिने उशिराने सुरु करण्यात आल्यामुळे विद्‌यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची दोन्ही वर्षांची शिष्यवृत्ती अद्‌याप मिळाली नसल्याचे दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, करोनाच्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागांच्या शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली असतानाही अर्जासोबत जोडावी लागणारी उत्पन्नाचे प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे मिळण्यात अडचणी येत असल्याने राज्यातील लाखो विद्‌यार्थी पात्र असूनही शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्याचे दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्‌यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या रकमेचे दोन्ही टप्पे एकाचवेळी देण्यात यावेत अशी मागणी विदर्भ विनाअनुदान इंजिनिअरिंग कॉलेजेस मॅनेजमेंट्स असोसिएशनमार्फत शासनाकडे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील एकही पात्र विद्‌यार्थी आवश्यक दाखल्यांच्या अनुपलब्धतेमुळे सदरहू शिष्यवृत्ती योजनांपासून वंचित राहू नये याकरीता तसेच विद्‌यार्थ्यांना शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीच्या दोन्ही टप्प्यांची रक्कम एकाचवेळी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१३-१२-२०२१) :** (१) अंशत खरे आहे.

डीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्याची कार्यवाही ही माहीती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडून करण्यात येते. सन २०२०-२०२१ साठी माहीती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडून दिनांक ३ डिसेंबर, २०२० रोजीपासून पोर्टल सुरू करण्यात आले व विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यासाठी दिनांक २० ऑक्टोबर, २०२१ रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेकरीता सन २०२१-२०२२ मध्ये रुपये ६२२.०० कोटी मंजूर केले असून त्यापैकी ५० टक्के मर्यादेत दिनांक ४ ऑगस्ट, २०२१ च्या शासन निर्णयान्वये रुपये ३११.०० कोटी निधीचा पहिला हप्ता व दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ च्या शासन निर्णयान्वये निधीचा दुसरा हप्ता रुपये ३११.०० कोटी वितरीत करण्यात आला आहे.

(२) व (३) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत २,१९,४४८ एवढ्या विद्यार्थ्यांनी अर्ज भरलेले आहेत.

प्रमाणपत्राअभावी अर्ज भरता येत नाहीत, अशा स्वरुपाची तक्रार विद्यार्थ्यांकडून किंवा संस्थेकडून तंत्र शिक्षण संचालनालयास प्राप्त झालेली नाही.

तसेच दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयानुसार मंजूर शिष्यवृत्तीची रक्कम दोन हप्त्यामध्ये देण्यात येते.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यात धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(४) ९०७७ (२३-०६-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यात रब्बी हंगामातील धान बाजारपेठेत विक्री येण्यास सुरुवात होवूनही अद्याप शासकीय धान खरेदी केंद्र सुरु झाले नाही, तसेच, शासकीय धान खरेदी केंद्रावर धानाला रुपये २५६८

प्रति क्विंटल दर मिळत असून शासकीय धान खरेदी केंद्र सुरु न झाल्याने शेतकऱ्यांना गरजेपोटी खाजगी व्यापाऱ्यांना अल्प दराने धान विकण्याची वेळ आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील शासकीय धान खरेदी केंद्र सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अर्जुनी मोरगाव तालुक्यात धान खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (२१-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

तांत्रिक कारणामुळे खरेदीसाठीचे ऑनलाईन पोर्टल दिनांक २६/०५/२०२१ रोजी सुरु झाल्याने, मार्केटिंग फेडरेशमार्फत दिनांक २७/०५/२०२१ पासून अर्जुनी मोरगाव तालुक्यात १० खरेदी केंद्रांवर धान खरेदी सुरु करण्यात आली.

तसेच खरीप पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये आदिवासी विकास महामंडळामार्फत खरेदी केलेला धान भरडाईसाठी मिलर्स प्रतिसाद न दिल्याने धानाची उचल झाली नाही. परिणामी जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी दिनांक ०४/०६/२०२१ रोजी रब्बी हंगामाचे खरेदीकरीता जिल्हा परिषद शाळा, आश्रमशाळा, शासकीय इमारतीची जागा धान खरेदीसाठी उपलब्ध करुन दिल्यामुळे आदिवासी विकास महामंडळामार्फत अर्जुनी मोरगाव तालुक्यात ६ खरेदी केंद्रावर धान खरेदी करण्यात आली.

अर्जुनी मोरगाव तालुक्यात रब्बी पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये एकूण १६ खरेदी केंद्रावर ४७९२६६ क्विंटल धानाची खरेदी करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, गोंदिया यांनी दिनांक १ जून, २०२१ रोजीच्या पत्राद्वारे अभिकर्ता संस्थांनी पर्यायी व्यवस्था करुन गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांच्या रब्बी धानाची खरेदी तातडीने सुरु करण्याबाबत सूचना दिल्या त्यानुसार अभिकर्ता संस्थांनी तातडीने धान खरेदी सुरु केली.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी येथे अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(५) ९२९८ (२०-०७-२०२१) श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी येथे ३०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करावयाच्या प्रस्तावास शासनाने दिनांक २४ मार्च, २०२१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार सदर अभियांत्रिकी महाविद्यालय सन २०२१-२०२२ च्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात येणार असून टप्प्याटप्प्याने एकूण ६५ शिक्षक व ५० शिक्षकेतर कर्मचारी यांची पदे भरण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभियांत्रिकी महाविद्यालय कोणत्या ठिकाणी सुरु करण्यात येणार आहे व त्यासाठी निधी उपलब्धतेच्या नियोजनानुसार किती निधी उपलब्ध करण्यात येणार आहे ?

**श्री.उदय सामंत (१३-१२-२०२१) :** (१) व (२) दिनांक २५ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रत्नागिरी येथे ३०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांच्याकडून सध्या शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून सदर महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे.

तसेच, सदर महाविद्यालयाकरीता ६५ शिक्षक व ५० शिक्षकेतर पदे टप्प्याटप्प्याने भरण्यात येणार आहेत.
(३) सदर नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय रत्नागिरी जिल्ह्यात रत्नागिरी शहरात शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी आवार येथे १०.४५ एकर क्षेत्रफळ जागेत सुरु करण्यात येणार आहे. सदर महाविद्यालयासाठी शासन निर्णय दिनांक २५ मार्च, २०२१ मध्ये नमूद केल्यानुसार अनावर्ती खर्चाकरीता रुपये १०९८१.५६ लक्ष व आवर्ती खर्चाकरीता रुपये ४३६०.७९ लक्ष असा एकूण रुपये १५३४२.३५ लक्ष इतका निधी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

---

## कोल्हापूर व मुंबई विभागातील उच्च माध्यमिक शाळांना अनुदान मंजूर करणेबाबत

**(६) ९३३३ (२०-०७-२०२१) श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) खाजगी उच्च माध्यमिक शाळांना मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात अनुदानास पात्र घोषित करून अनुदानाची तरतूद करण्यात आली असून राज्यात कायम विनाअनुदानित तत्वावर सुरू असलेल्या उच्च माध्यमिकच्या शाळांना शासनाकडून मूल्यांकन करून अनुदान मंजूर केले असून राज्यातील मुंबई व कोल्हापूर विभाग वगळता सर्व विभागातील पात्र उच्च माध्यमिक शाळांना शासनाच्या आदेशानुसार वेतन अनुदान निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शाळा दिनांक १३ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार २० टक्के अनुदानास पात्र ठरल्या असून पात्र ठरलेल्या उच्च माध्यमिक शाळांची पहिली यादी दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी वा

त्यादरम्यान घोषित करण्यात आली असून कोल्हापूर विभागातील कोल्हापूरसह सांगली, सातारा, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १०९ कनिष्ठ महाविद्यालये अनुदानास पात्र असताना शासनाच्या दिनांक ४ डिसेंबर, २०२० रोजीच्या शाळांची पुन्हा तपासणी केल्यानंतर उक्त शासन निर्णयामुळे सदरहू कनिष्ठ महाविद्यालये २० टक्के शासकीय अनुदानापासून वंचित राहिल्याचे दिनांक १६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई व कोल्हापूर विभागातील प्रस्ताव विलंबाने सादर झाल्याने तसेच त्यांच्या अनुदानाची तरतूद न झाल्याने मुंबई आणि कोल्हापूर विभागातील मूल्यांकन झालेल्या पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांना २० टक्के आणि ४० टक्के अनुदानातून वगळण्यात आल्याने सदरहू विभागातील अनुदानास पात्र उच्च माध्यमिक शाळांना अनुदान तरतूद करणेबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, कोल्हापूर विभागातील शाळा तपासणी पूर्ण होऊन २० टक्के अनुदानास पात्र असतानाही अनुदानास सर्व शाळांसोबत पात्र होऊ शकल्या नाही तसेच पात्र शाळांना अनुदान वितरणाच्या शासन निर्णयामध्ये निधीची तरतूद करावी अन्यथा आधी वेतन मग परीक्षा असे आंदोलन करण्यात येईल, असा इशारा वजा मागणी महाराष्ट्र राज्य कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळा कृती समितीमार्फत शासनाकडे करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई व कोल्हापूर विभागातील उच्च माध्यमिक शाळांना तसेच कनिष्ठ महाविद्यालयांना वेतन अनुदान तरतूद देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

मुंबई व कोल्हापूर विभागातील खाजगी उच्च माध्यमिक शाळांना वेतन अनुदानासाठी शासन निर्णय, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के वेतन अनुदानासाठी माहे नोव्हेंबर, २०२० पासून पात्र घोषित करण्यात आले आहे. सदर पात्र उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना वेतन अनुदान अदा करण्यासाठी सन २०२१ च्या पावसाळी

अधिवेशनात रुपये २०६९.४४ लक्ष इतक्या तसेच, शासन निर्णय, दिनांक १५/०२/२०२१ अन्वये वेतन अनुदानासाठी माहे नोव्हेंबर, २०२० पासून पात्र घोषित माध्यमिक शाळा/तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या २० टक्के / वाढीव २० टक्के अनुदानासाठी रुपये १३९४२.१८ लक्ष असा एकूण रुपये १६०११.६२ लक्ष पुरक मागणीचा प्रस्ताव विधानमंडळास सादर करण्यात आला असून सदर पुरक मागणीस विधिमंडळाने मान्यता दिली आहे. सदर पुरवणी मागणीपैकी रुपये ८००५.८४ लक्ष इतका निधी शासन निर्णय, दिनांक १८ ऑगस्ट, २०२१ अन्वये राज्यातील खाजगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/तुकड्यांवरील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन अनुदानासाठी आयुक्त (शिक्षण), म.रा., पुणे यांना वितरीत करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा करण्याबाबत

**(७) ९४१७ (२०-०७-२०२१) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे मार्च, २०२१ चे वेतन तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित असल्याने कोषागार कार्यालये, अधिदान व लेखाधिकारी तसेच शिक्षण विभाग यांना सूचना देवून वेतन काढण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती शिक्षक परिषदेने मा.मुख्यमंत्री व मा.उप मुख्यमंत्री महोदयांना पत्राद्वारे केल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील १०० हुन अधिक शाळेतील शिक्षकांचे माहे फेब्रुवारी, २०२१ चे वेतनही दिरंगाईमुळे प्रलंबित राहिल्याने हजारो शिक्षकांना कर्जाच्या हप्त्याचा भुर्दंड सहन करावा लागल्याने महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने माहे मार्च, २०२१ च्या वेतनाबाबत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करुनही वेळीच कार्यवाही न केल्याने पुन्हा तांत्रिक बाब निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व शिक्षकांना दरवर्षी मार्च महिन्याचे वेतन तांत्रिक कारणाने प्रलंबित राहू नये याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. एन.पी.एस. ची रक्कम कोणत्या खात्यावर जमा करावी, याबाबत स्पष्ट आदेश नसल्याने कोषागार कार्यालयाने वेतन देयकावर आक्षेप नमुद करून देयके परत केली होती. तद्नंतर शासन आदेश क्र. अनियो-२४१५/प्र.क्र.२७६, दिनांक २३/०४/२०२१ च्या पत्रानुसार त्रुटींची पूर्तता करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे माहे मार्च, २०२१ चे नियमित वेतन माहे एप्रिल, २०२१ मध्ये अदा करण्यात आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोफळी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील महानिर्मिती कंपनीतील कामगारांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(८) ९४१९ (२२-०६-२०२१) अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात करोनाच्या काळात महानिर्मिती कंपनीने इतिहासातील वीज निर्मितीचा उच्चांक गाठला असताना कंपनीतील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मिती कंपनीने कोणतेही कारण न देता हजारो कामगारांचे वेतन थकविल्यामुळे पोफळी (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील विद्युत क्षेत्र कामगार युनियनने आंदोलन करण्याचा इशारा दिल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानिर्मिती कंपनीतील कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२९-११-२०२१) :** (१), (२) व (३) महानिर्मिती कंपनीमधील कर्मचाऱ्यांचे वेतन सर्वसाधारणपणे महिन्याच्या शेवटच्या कार्यालयीन दिवशी करण्यात येते. परंतु मार्च, २०२१ या महिन्याचे वेतन दिनांक ०१/०४/२०२१ रोजी आर्थिक वर्ष हिशोब पूर्तीनिमित्त बँका बंद असल्याने तसेच दिनांक ०२, ०३ व ०४ एप्रिल, २०२१ रोजी सुट्टी असल्याने कर्मचाऱ्यांचे वेतन दिनांक ०५ एप्रिल, २०२१ रोजी अदा करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन हप्ता व नियमित कपात पावत्या मिळण्याबाबत

**(९) ९५०१ (१५-०६-२०२१) श्री.विक्रम काळे, श्री.जयंत आसगावकर, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवीन परिभाषित अंशदान सेवानिवृत्त वेतन योजना लागू असणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन हप्ता व नियमित कपात पावत्या तसेच शासनाच्या हिश्याची रक्कम दिली नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील सातवा वेतन हप्ता व नियमित कपात पावत्या म्हणजेच त्यांच्या वेतनातून कपात झालेली रक्कम व शासनाच्या हिश्याची रक्कम अशी एकत्रित हिशोबाची पावती प्रकरणी शिक्षण व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेने वारंवार शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे. सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात संपूर्ण देशभरात कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या महामारीच्या परिस्थितीमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रत्येक महिन्यांकरीता वेतनासाठी आवश्यक असणारा निधी एकूण वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ५ ते १५ टक्केच्या मर्यादेत मासिक स्वरुपात तात्पुरती व्यवस्था म्हणून वित्त विभागाकडून खर्चासाठी उपलब्ध करुन देण्यात येत होता. सबब काही जिल्ह्यांमध्ये सातव्या वेतन आयोगाचा पहिला हप्ता अदा करण्यात आलेला नाही.

(२) अंशदायी सेवानिवृत्ती वेतन योजनेच्या पावत्या तातडीने देण्याबाबत संचालक स्तरावरुन निर्देश व्ही.सी.द्वारे व पत्रान्वये देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य परिवहन महामंडळाने लालपरी भाडेतत्वावर घेण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत

**(१०) ९७९५ (१५-०७-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने ५०० लालपरी भाडेतत्वावर घेण्याबाबतचा निर्णय नुकताच माहे एप्रिल, २०२१ मध्ये घेतला असून आधीच एसटी महामंडळ तोटयात असताना ५०० लालपरी भाडेतत्वावर घेण्याबाबतची कारणे काय आहेत,

(२) असल्यास, अशाचप्रकारे भाडेतत्वावर शिवशाही बसेस सुरु केल्यामुळे महामंडळाचे अतोनात नुकसान झाले असून राज्य परिवहन महामंडळाने घेतलेला निर्णय तात्काळ रद्द न केल्यास एसटी कामगार संघटनेने तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (१४-१२-२०२१) :** (१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तोटा कमी करण्याच्यादृष्टीने विविध उपाययोजना व वेगवेगळे उपलब्ध पर्याय अवलंबण्यास सुरुवात केली असून, त्याअनुषंगाने प्रतिबस मनुष्यबळ व प्रती किलोमीटर खर्च कमी करण्यासाठी तसेच, राज्य परिवहन महामंडळाचा प्रवासी वर्ग हा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील असल्याने साध्या बसेसद्वारे प्रवास करण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. महामंडळाद्वारे आयुर्मान संपलेल्या बसेस मोडीत काढण्याची प्रक्रिया दरवर्षी राबविली जाते व काही बसेसचे मालवाहतूकीच्या ट्रकमध्ये रुपांतर केल्यामुळे साध्या बसेसचा तुटवडा भासु नये म्हणून साध्या बसेस भाड्याने घेण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) हे खरे आहे.

महाराष्ट्र एस.टी.कामगार संघटनेने मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २७/०५/२०२१ च्या पत्रान्वये निवेदन दिले आहे.

(३) सदरचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या हितास्तव असल्याने चौकशीची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अन्न व औषध प्रशासन विभागातील अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) ९९०१ (१५-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.अभिजित वंजारी, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात अन्न व औषध प्रशासन विभागातील ४३ टक्के पदे रिक्त असल्याचे नुकतेच माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून सदरहू रिक्त पदांमध्ये सहआयुक्त, सहायक आयुक्त, अन्न सुरक्षा अधिकारी, औषध निरीक्षक अशा काही महत्वाच्या पदांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीमध्ये मंजूर १ हजार ३६१ पदांपैकी ४३ टक्के म्हणजेच ५८५ पदे रिक्त असल्याने कोरोना आपत्तीच्या काळात ऑक्सिजन, रेमडेसिवीरसह औषधांच्या नियोजनासाठी अपुऱ्या कर्मचाऱ्यांचा कामकाजावर परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच अन्न सुरक्षा अधिकारी पदावर शेवटची भरती केव्हा करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. राजेंद्र शिंगणे (१६-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सह आयुक्त (अन्न व औषधे) संवर्गातील सर्व रिक्त पदे पदोन्नतीने व सहायक आयुक्त (अन्न व औषधे) संवर्गातील रिक्त पदे विहीत मर्यादेत पदोन्नतीने व नामनिर्देशनाने, त्याच प्रमाणे अन्न सुरक्षा अधिकारी व औषध निरीक्षक या संवर्गातील सर्व रिक्त पदे नामनिर्देशनाने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. नामनिर्देशनाने भरावयाच्या पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे अन्न सुरक्षा अधिकारी पदाची शेवटची भरती सन २०१७ मध्ये झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील त्रुटी पूर्ण केलेल्या शाळा व तुकड्यांना वेतन वितरीत करण्याबाबत

**(१२) १००१४ (२०-०७-२०२१) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुदान घोषित केलेल्या पण त्रुटी दाखविण्यात आलेल्या शाळा व तुकड्यांना तात्काळ त्यांच्या त्रुटी पूर्ण करून वेतन वितरणाचा आदेश अद्यापपर्यंत देण्यात न आल्याचे माहे मे, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार सदरहू शाळा व तुकड्यांना तात्काळ त्रुटी पूर्ण करून वेतन वितरणाचा आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) व (२) अंशत: हे खरे आहे.

राज्यातील खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतन अनुदानासाठी शासन निर्णय, दिनांक १२, १५ व २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २० टक्के वेतन अनुदानासाठी व यापूर्वी २० टक्के वेतन अनुदान घेत असलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना वाढीव २० टक्के अनुदानासाठी पात्र घोषित करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयासोबतच्या प्रपत्रात त्रुटीमुळे अपात्र करण्यात आलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांची गठित समितीमार्फत स्थानिक पातळीवर जाऊन तपासणी करण्यात आली. फेरमुल्यांकनात वेतन अनुदानासाठी पात्र ठरलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदानासाठी पात्र घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाल्यानंतर याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तद्नंतर विधानमंडळाच्या मान्यतेने यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता घेऊन वेतनासाठी अनुदान मंजूर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन अदा करण्याबाबत

**(१३) १०१९३ (०८-११-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक विनाअनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना मागील अनेक महिन्यांपासून संस्थांनी वेतन दिले नसल्याचे दिनांक २५ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना तातडीने वेतन मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (०५-०१-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

कायम विनाअनुदानित महाविद्यालयामधील कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधित संस्थेची आहे.

तथापि, कोविड-१९ च्या महामारीच्या काळात राज्यातील विद्यापीठ संलग्नित असलेल्या विनाअनुदानित महाविद्यालयातील तसेच अनुदानित महाविद्यालयातील विनाअनुदानित विभागातील शिक्षकांच्या वेतनाबाबतच्या तक्रारी काही विद्यापीठांस प्राप्त झाल्या असून, या तक्रारीबाबत विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची सत्यशोधन समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने संबंधित महाविद्यालयांना/संस्थांना तक्रारकर्ते शिक्षकांविरूध्द कोणतीही दंडात्मक कारवाई न करता त्यांना देय होणारे वेतन/थकीत वेतन त्वरीत अदा करण्याबाबत विद्यापीठ स्तरावरून सूचीत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उच्च शिक्षण विभागातर्फे सुरु असलेल्या विविध शिष्यवृत्ती योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्याबाबत

**(१४) १०२०५ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात उच्च शिक्षण विभागातर्फे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आल्या असून कोविड-१९ च्या वाढत्या प्रादुर्भावामुळे शाळा/महाविद्यालये बंद ठेवल्याने ह्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती गोरगरीब/आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थ्यांपर्यंत पोहचली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सन २०२०-२०२१ मध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे, त्यापैकी किती टक्के विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ऑनलाईन फॉर्म भरले आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू शिष्यवृत्ती योजनांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (१७-१२-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या माहिती व्यवस्थापन प्रणालीवरील सन २०२०-२०२१ मध्ये विविध अभ्यासक्रमांसाठी २७,१५,७८७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यापैकी केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांमध्ये १,२२,३०५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज सादर केले आहेत. त्यापैकी ७७,६५९ अर्ज संचालनालय स्तरावर मंजूर करण्यात आले असून ५८,८०४ विद्यार्थ्यांना केंद्र शासनाकडून शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले आहे. हे प्रमाण ४८.८ टक्के इतके आहे. तसेच राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांकरीता एकूण २,१०,३९९ विद्यार्थ्यांनी अर्ज सादर केले आहेत. त्यापैकी १,६८,०९५ विद्यार्थ्यांचे अर्ज संचालनालयस्तरावरुन मंजूर झाले असून महाआयटी विभागाकडून १,४७,३३० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले आहे.

हे प्रमाण ७०.२ टक्के इतके आहे. अर्ज मागविणे / पडताळणी इत्यादी कार्यवाही अद्यापही सुरु असल्याने शिष्यवृत्ती लाभार्थ्यांमध्ये वाढ होणार आहे.

(३) केंद्र व राज्य शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांबाबत उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सर्व विभागीय स्तरावर नोडल अधिकारी, सहाय्यक नोडल अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे नाव, दुरध्वनी क्रमांक व भ्रमणध्वणी यांचा तपशिल संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी अंमलबजावणीसाठी विभागीय सहसंचालक यांच्या अधिनस्त महाविद्यालयांतील प्राचार्यांच्या वेळोवेळी बैठका आयोजित करण्यात येतात. तसेच महाविद्यालय स्तरावर शिष्यवृत्तीचे अर्ज स्विकारताना येणाऱ्या अडचणींचे निरसण करण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येतात. वेळोवेळी अयोजित कार्यशाळांमध्ये सरासरी ३००-३५० महाविद्यालयांची उपस्थिती नोंदविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता जिल्हा बालभवन सुरु करण्याबाबत

**(१५) १०२१३ (०१-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ६ ते १४ वयोगटातील मुलांची विचार क्षमता विकसित करणे व कौशल्य, आत्मविश्वास व्यक्तीमहत्व इत्यादी विविध बाबी जिल्हा बालभवन योजनेमार्फत स्थानिक खाजगी संस्थेकडून राबविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक बालभवनला देण्यात येणारे वार्षिक अनुदान अत्यल्प असल्याने यामध्ये संचालकाचे मानधन, वाचनालय, खेळ, शिपायाचे मानधन, स्थानिक तज्ञव्यक्तीचे कार्यक्रम, सहली व सांस्कृतिक कार्यक्रम आदि राबविण्यात येत आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सर्व जिल्हा बालभवनामध्ये कर्मचारी अत्यल्प मानधनावर काम करण्यास तयार नसून इतर मानधन देखील अल्प असल्याने आवश्यक ते उद्दीष्ट साधता येत नसल्याने विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या अभावी जिल्हा बालभवन बंद पडत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हा बालभवन योजनांचा कार्यक्रम राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांना किमान वेतन व इतर कार्यक्रमासाठी पुरेसे मानधन देवून विद्यार्थ्यांचा विकास होण्याच्यादृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कनिष्ठ महाविद्यालयातील अनुदानित तुकड्यांवरील माहिती तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(१६) १०२१७ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सन २००१-२००२ पासून कनिष्ठ महाविद्यालयात अनुदानित तुकडीवर माहिती तंत्रज्ञान विषयासाठी नियुक्त मान्यताप्राप्त ९५ शिक्षकांना (९० पूर्णवेळ व ५ अर्धवेळ) वेतन अनुदान न दिल्यामुळे सदरहू शिक्षक विनावेतन कार्य करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४ मध्ये बहिष्कार आंदोलनावेळी व त्यानंतर दिनांक २६ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत तत्कालीन शिक्षण मंत्र्यांना देण्यात आलेल्या वेतन अनुदान मंजुरीच्या आश्वासनाची पूर्तता कार्यरत शासनाने केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक २८/०५/२०२१ रोजी पत्र पाठवून ५ कोटींची वेतन अनुदानाची तरतूद करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच सदरहू महत्वाच्या विषयाबाबत दीर्घ कालावधीपासून तरतूद न करण्याची कारणे काय आहेत, याबाबत आर्थिक तरतूद करून वेतन अनुदान केव्हापर्यंत देण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१४-१२-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

उच्च माध्यमिक स्तरावर एकूण सहा विषय अभ्यासिले जातात. यामध्ये १) इंग्रजी २) आधुनिक भारतीय भाषा किंवा आधुनिक परकीय भाषा अभिजात भाषा व ३) चार वैकल्पिक विषय यांचा समावेश आहे. माध्यमिक शाळेला जोडलेल्या उच्च माध्यमिक वर्गांमध्ये सर्वसाधारणापणे ८० प्रवेश क्षमता असते. तसेच वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेल्या उच्च माध्यमिकच्या वर्गांमधून १२० प्रवेश क्षमता असते. उच्च माध्यमिक स्तरावर सर्वसाधरणपणे एका तुकडीच्या प्रवेश क्षमतेपर्यंत एखादा विषय विद्यार्थ्यांना घेऊ दिला जातो. वर्ग तुकड्यांच्या मर्यादेपेक्षा अधिक होणाऱ्या विद्यार्थ्यांना ते इच्छूक असूनही संबंधित विषय अभ्यासता येत नाही. शिक्षण हे विद्यार्थी केंद्रीत असावे हा दृष्टीकोन ठेवून शालेय शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. एचएससी १८०४/(३०१/४)/ उमाशि-१, दिनांक २४/०८/२००४ नुसार उच्च माध्यमिक स्तरावर एखादा वैकल्पिक विषय शिकविला जात असेल, परंतु त्या तुकडीची त्या विषयाची प्रवेश क्षमता पूर्ण झाल्यानंतर (उदा. ८० किंवा १२०) जर २० किंवा त्या पटीत त्या विषयासाठी विद्यार्थी उपलब्ध होत असतील तर, अशा विद्यार्थ्यांच्या एका गटाला (बॅच) त्या विषयासाठी विहित अटी व शर्तीवर मान्यता देण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार हा गट (बॅच) कायम विना अनुदान तत्वावर राहील. या गटासाठी जो कार्यभार उपलब्ध होईल त्याकरीता अनुज्ञेय होणाऱ्या शिक्षकांचे वेतन, संबंधित गटातील विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क आकारून भागविले जाईल व ही जबाबदारी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयाची/उच्च माध्यमिक शाळेची राहील.

(३) होय, हे खरे आहे.

(४) यासंदर्भात सर्व शिक्षक लोकप्रतिनिधींसोबत दिनांक १७/११/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्ताव तपासण्याबाबतच्या सूचना आयुक्त (शिक्षण)/ शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांना प्रतिपुर्ती रक्कम अदा करण्याबाबत

**(१७) १०२१८ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरटीईनुसार खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना २५ टक्के जागा राखीव ठेवून त्यांचे प्रवेश शुल्क प्रतिपुर्तीच्या रुपात शाळांना अदा करण्याची कायदेशीर व घटनात्मक जबाबदारी शासनावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांची प्रतिपुर्ती रक्कम शासनाने कधीपासून अदा केली नाही, तसेच, शासनाने सन २०१९-२०२० पासून प्रतिपुर्ती शुल्क कपात करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुल्क कपातीचा निर्णय रद्द करून प्रतिपुर्ती रक्कम अदा करण्याची मागणी नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी शासनास दिनांक ३१ मे, २०२१ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (१३-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे. काही अटी-शर्तीवर सदर रक्कम अदा केली जाते.

(२) प्रलंबित शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती शाळांना अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर, शाळा नियमित सुरु नसल्याने त्यांच्या खर्चात झालेली बचत विचारात घेऊन, शैक्षणिक शुल्काचा दर त्या वर्षाकरीता कमी केला आहे.

(३) काही शैक्षणिक संस्थांच्या संघटनांची निवेदने प्राप्त आहेत.

(४) शासन निर्णय, दिनांक २८/१०/२०२१ अन्वये रुपये १०० कोटी इतका निधी आर.टी.ई. २५ टक्के शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी उपलब्ध करुन दिला आहे. अर्थसंकल्पीय मंजूर तरतूदीपैकी उर्वरित रुपये १०० कोटी निधी मागणी प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील इमारतींना निवासी दाखला (ओसी) देण्याबाबत

**(१८) १०२२१ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील ६७ पैकी ३८ इमारतींकडे महापालिकेचा निवासी दाखला (ओसी) नसल्याची माहिती सिनेटच्या माहे मार्च, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात वा झालेल्या बैठकीत निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतींचे बांधकाम सन १९९५ पासून करण्यात आले असून यामध्ये ग्रंथालय, शिक्षकांचे निवासगृह, विद्यार्थ्यांचे वस्तीगृह, उपहारगृह, आयटी पार्क, मराठी भवन, परीक्षा भवन आदी आयडॉल इमारतींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू सर्व इमारतींना निवासी दाखला (ओसी) मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२०-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) इमारतींना निवासी दाखला मिळण्याच्या अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेसोबत पाठपुरावा सुरु असून निवासी दाखला मिळणेचे अनुषंगाने महापालिकेमार्फत वेळोवेळी दिलेल्या त्रुटींची पुर्तता करणे प्रगतीपथावर आहे.
(४) लागू नाही.

---

## इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकांना वेतन देण्याबाबत

**(१९) १०२४७ (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-
(१) राज्यात मुंबई विद्यापीठाशी संलग्नित इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेत ५ महिन्यांचे वेतन देण्याचे निर्देश अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने (एआयसीटीई) संस्थेच्या व्यवस्थापनेला दिल्याचे माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार आधी वेतन द्या अन्यथा कारवाईला सामोरे जा तसेच दिनांक १५ मे, २०२१ पर्यंत अहवाल सादर करा अशा अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने अभियांत्रिकी महाविद्यालयाला सूचना (एआयसीटीई) दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयातील प्राध्यापकांना वेतन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत (२२-१२-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

श्रीमती इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, घनसोली, नवी मुंबई, ठाणे या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या वेतनासंदर्भात अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या दिनांक ०४ जुलै, २०२१ च्या आदेशानुसार ज्या अध्यापकांचे १२ महिन्यापेक्षा जास्त वेतन थकित आहे त्यांना दिनांक १२ जुलै, २०२१ पर्यंत तीन महिन्याचे थकित वेतन देण्याची व उर्वरित थकित वेतन १ वर्षाच्या आत देण्याकरीता संबंधित संस्थेस निर्देशित केलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या दिनांक ०४ जुलै, २०२१ च्या आदेशानुसार दिनांक १५ जुलै, २०२१ पर्यंत अहवाल सादर करावा अशा सूचना संबंधित संस्थेला दिलेल्या आहेत.

(३) इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयाने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या दिनांक ४ जुलै, २०२१ च्या आदेशास अनुसरुन अध्यापकांच्या थकित १९ महिन्यांच्या वेतनापैकी ३ महिन्यांचे वेतन दिनांक ०९ जुलै, २०२१ रोजी अदा केले आहेत. याबाबतचा अहवाल संस्थेने अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना दिनांक १२ जुलै, २०२१ च्या पत्रान्वये सादर केला आहे. तद्नंतर संस्थेने जुलै, २०२१ ते नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत थकित १९ महिन्यांच्या वेतनापैकी ११ महिन्यांचे वेतन अदा केल्याची माहिती दिनांक ०१ डिसेंबर, २०२१ च्या पत्रान्वये कळविली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदीनुसार सदर महाविद्यालयातील प्रलंबित वेतनाच्या तक्रारीबाबतची कार्यवाही मुंबई विद्यापीठाच्या अधिकारकक्षेतील असल्याने सदर तक्रारी मुंबई विद्यापीठाकडे दिनांक २६ फेब्रुवारी, २०२१, दिनांक १४ जून, २०२१ व दिनांक ०१ ऑगस्ट, २०२१ च्या पत्रान्वये तंत्र शिक्षण संचालनालयाने पाठविल्या आहेत.

थकित वेतनाबाबत संबंधित काही कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रीट याचिका क्रमांक ३२१३/२०२१ दाखल केलेली असल्याने सद्य:स्थितीत प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) लागू नाही.

---

## राज्यातील सर्व अनुदानित शाळांचे वेतनेतर अनुदान देण्याबाबत

**(२०) १०२८० (०२-१०-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व शिक्षा अभियान व अन्य योजनांद्वारे राज्य व केंद्र शासन निधी खर्च करीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेतनेतर अनुदान न मिळाल्याने महाराष्ट्रातील सर्व अनुदानित शाळांचे सन २००४ ते २०१३ व सन २०१९-२०२० चे वेतनेतर अनुदान प्रलंबित असल्याने संस्था चालकांसह मुख्याध्यापकही अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना साहित्य, इमारत भाडे तसेच शाळेला लागणारी आवश्यक स्टेशनरी, खडु, फर्निचर यासाठी राज्य शासनाच्यावतीने वेतनेतर अनुदान देण्याची तरतूद असताना शाळांना अनुदान देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (२०-१२-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा योजनेंतर्गत शासकीय शाळांना संयुक्त शाळा अनुदान उपक्रमांतर्गत निधी मंजूर करण्यात येतो.
(२), (३) व (४) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय, दिनांक १९ जानेवारी, २०१३ नुसार दिनांक ०१ एप्रिल, २०१३ या आर्थिक वर्षापासून वेतनेतर अनुदान उपलब्ध करण्यास मान्यता दिलेली आहे.

राज्यातील कायम विनाअनुदानित खाजगी प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदानासाठी सन २०२१-२०२२ करीता शासन निर्णय, दिनांक ०३/०९/२०२१ अन्वये रुपये २६.७५ कोटी तसेच, शासन निर्णय, दिनांक ०२/११/२०२१ अन्वये रुपये ५१.७० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.